## बलात्काराची कारणे - न पटणारी

**भाग ४**

बलात्कार हा स्त्रियाच स्वतःवर ओढवून घेतात असे समाजात मानले जाते. इतरही अनेक गैरसमज आहेत.

चांगल्या बाईवर कोण बलात्कार करेल? असे म्हटले जाते. बलात्कार करण्यापूर्वी बाईची चारित्र्यपडताळणी केली जाते काय? नाही. ती एकटी आहे, तिला मदतीला कोणीही येऊ शकणार नाही एवढे महत्वाचे ठरते.

दुसरा गैरसमज म्हणजे लैंगिक उपभोगासाठी बलात्कार होतो. बलात्काराच्या वेळी किंचाळणाऱ्या, विरोध करणाऱ्या बाईकडून बलात्कारी पुरुषाला कोणते लैंगिक सुख मिळत असेल? पुन्हा वेश्यागमनासारखा मार्ग उपलब्ध असताना बलात्कार का करावा?

आणखी एक गैरसमज म्हणजे तोकडे कपडे घातल्यामुळे बलात्कार होतो. पण हे काही खरे नाही. कारण बुरखा घातलेली, अंगभर नऊवारी साडी घातलेली, फ्रॉक घातलेली, सलवार-कमीज घातलेली कोणतीच स्त्री बलात्कारासाठी अपवाद नाही. त्यामुळे जिच्यावर बलात्कार होतो तिने कोणते कपडे घातले होते यावर बोलणे हास्यास्पद आहे.

याशिवाय पुरुषाला स्त्रीने चाळवले किंवा उद्दीपित केले म्हणजे बलात्कार होतो असे म्हणून स्त्रीला दोष दिला जातो. मग दीड-दोन वर्षांची बालिका, नऊ-दहा वर्षांच्या परकरी मुली यांच्यावर होणाऱ्या बलात्कारांचे स्पष्टीकरण कसे द्यायचे?

प्रसारमाध्यमांचा परिणाम म्हणून बलात्कार होतो. हा आणखी एक गैरसमज आहे. कारण प्रसारमाध्यमे अस्तित्वात नव्हती तेव्हादेखील बलात्कार होत होते. तेव्हा हे प्रसारमाध्यमाचे कारणही मान्य करता येत नाही.

आणखी एक गैरसमज असा आहे की, माणसातील पशु जागा होतो आणि बलात्कार होतो. पण प्राण्यांमध्ये बलात्कार होत नाहीत. मात्र मानवप्राणी निसर्गनियम पाळत नाही. पशु मात्र निसर्गनियमानुसार जगतात. विशिष्ट काळात माजावर येतात. त्या काळात वंश सातत्यासाठी लैंगिक संबंध प्रस्थापित केले जातात. तेव्हा पशु आणि बलात्काराचा हा संबंध मिथ्या आहे.

निर्जन ठिकाणी नेऊन, अनोळखी माणसेच फक्त बलात्कार करतात, हे समजसुद्धा आधारहीन आहेत. प्रत्यक्षात आकडेवारी सांगते की, स्वतःचे घर हि सुद्धा सुरक्षित जागा नाही. ओळखीच्या लोकांकडून, जवळच्या नातेवाईकांकडून अगदी सख्खा भाऊ, आजोबा-काका-बापाकडून घरातच बलात्कार केल्याची उदाहरणे समूळ हादरवून टाकतात. कोणतेच नाते अपवाद राहिलेले नाही असे अगदी जगभरातील गतकालीन घटना

अभ्यासल्या तर दिसून येते. विशेष म्हणजे असे बलात्कार हे नियोजनबद्ध रीतीने केले जातात. कित्येकवेळा वर्षानुवर्षे केले जातात. अनोळखी लोकांपेक्षा ओळखीच्या पुरुषांकडून बलात्काराचा धोका जास्त असतो असे तज्ञमंडळी सांगतात. यावरून फक्त विकृत पुरुष बलात्कार करतात असा समजही चुकीचा ठरतो असे लक्षात येते.

या सगळ्या विवेचनावरून असे स्पष्ट होते की, 'चांगल्या बाईवर कोण बलात्कार करेल?', 'लैंगिक उपभोगासाठी बलात्कार', 'तोकडे कपडे घातल्यामुळे बलात्कार', 'प्रसारमाध्यमांचा परिणाम म्हणून बलात्कार', 'माणसातील पशु जागा होतो म्हणून बलात्कार', 'निर्जन ठिकाणी नेऊन बलात्कार', 'अनोळखी, विकृत माणसांकडून बलात्कार' हे सगळे निव्वळ गैरसमज आहेत. मात्र त्यापायी मुलींच्या हिंडण्या-फिरण्यावर, एकटे राहण्यावर, कपड्यांवर, व्यवसाय निवडीवर मर्यादा घातल्या जातात. त्यांचे स्वातंत्र्य हिरावून घेतले जाते आणि स्त्रीजातीवर परावलंबी होऊन बंधनात जगण्याची सक्ती केली जाते. भयमुक्त वातावरणात जगण्याचा हक्क हिरावून घेतला जातो. जर आपण स्त्रियांना दोषी ठरविणारे बलात्काराचे एक एक कारण विचारात घेऊन त्याला योग्य प्रतिप्रश्न केले तर ते कसे फोल, खोटे आहेत हे आपल्याला समजून येईल. आपण हे गैरसमज पसरविणे थांबविले पाहिजे. हे गैरसमज व्यक्त करणाऱ्यांचा प्रतिवाद केला पाहिजे.

हैदराबादेतील एका बलात्कार व हत्येच्या प्रकरणानंतर व्हॉटस ॲपवर 'बाईच्या जातीने किंवा आजकालच्या मुलींनी कसे जपून रहावे किंवा कोणती काळजी घेऊन जगावे' याबाबतचा एक संदेश आला होता. त्यात 'मुलींनी आपले रस्ते बदलत रहावे, पार्किंगच्या जागा, येण्याजाण्याच्या वेळासुद्धा बदलत रहावे' असे अजब सुरक्षानियम सुचविलेले होते. दोष या लेखकाच्या मनात रुतून बसलेल्या गैरसमजांचा आहे. हे गैरसमज नाहीसे झाले तर बलात्काराच्या गुन्ह्यात बलात्कार करणारा हाच फक्त दोषी, गुन्हेगार, कलंकित, क्रूर व्यक्ती असतो व तोच शिक्षेस पात्र असतो. एवढेच तथ्य मागे उरेल. बलात्कार म्हणजे नेमके काय? कायद्यात बलात्काराची व्याख्या काय केलेली आहे, ते जाणून घेऊया पुढील भागात.

ॲड. प्रज्ञा हेन्द्रे जोशी

अहमदनगर, मो. ९८५००७५४४३